नि. फौ. खटला क्र. <u>३५८/२०२२</u>
सरकार विरूद्ध प्रकाश
**निशाणी २४**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २ ची जबानी</u>**

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो/करते की,

माझे नाव : राजेश मुकुंदराव तेलगोटे,
वय : ४५ वर्षे,
धंदा : मिस्तरी,
राहणार : सोमवार वेस, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**सरतपासणी — अभियोगपक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. ओ. गाडेकर यांचेमार्फत —**

मी फिर्यादी व आरोपी दोघांना ओळखत नाही. मला आकोट शहर पोलीसांनी पंचनाम्यासाठी बोलवले नव्हते. माझेसमक्ष पंचनाम्याची कारवाई झाली नाही. आता मला घ टनास्थळ पंचनामा दाखवला. त्यावर अनु क्र. २ वर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. सदर सही मी कामावर जात असतांना पोलीसांच्या सांगण्यावरून केली होती.

***(साक्षीदार पुर्वीच्या जबाबाशी विसंगत कथन करीत असल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी दिली.)***

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. ०९/०६/२०२३ रोजी नंदीपेठ ते सोमवार वेस रोडवर फिर्यादीच्या गोडाउन मध्ये पोलीसांनी मला बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर ठिकाणी माझे समक्ष पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा तयार

केला व मला वाचुन दाखवला व त्यावर मी त्याठिकाणी सही केली होती.

३. हे म्हणणे खरे आहे की, मी फिर्यादी क्षितिज हाडोळे याचे गोडाउन पाहिलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यावरील सही मी फिर्यादीच्या गोडाउनसमोर केली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझे समवेत आशिष सुभाष बेलोकार यानेदेखील घटनास्थळ पंचनाम्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी पंचनाम्यावर सही केली त्यावेळेस फिर्यादीच्या गोडाउनजवळ पोलीस व फिर्यादी असे हजर होते. मी ज्या पंचनाम्यावर सही केली तो फिर्यादीच्या गोडाउन मध्ये चोरी झाल्याच्या घटनेबाबत होता किंवा कसे हे मला माहिती नाही.

४. माझे शिक्षण इयत्ता आठवीपर्यंत झाले आहे व मी कोणत्याही दस्तावर वाचुन समजुन घेतल्याशिवाय सही करत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनामा वाचुन व समजुन त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझा ओळखीचा असल्यामुळे मी त्याला वाचवण्यासाठी खोटी साक्ष देत आहे. **सरतपास पुर्ण.**

**उलटतपासणी — आरोपींतर्फे ॲडव्होकेट श्री. एस. जी. कुळकणी यांचे मार्फत नाकारण्यात आली.**

**फेरतपासणी — काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत.

**स्वा/—**

दि. ०६.०३.२०२६ (ए.ए. माळी)

अकोट न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

(न्या.क्र. २) अकोट, जि. अकोला.